# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०६/२०१९
## दि.०४/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २१६/१९,भादविक ३०७,३२५,५०४,५०६,१४३,१४७,१४८,१४९ |
| **फिर्यादी** | मोमीन शेख.वय २४ वर्षे,रा.ताडीवाला रोड पुणे. |
| **आरोपी** | १)मेरो २) विशाल व त्यांचे इतर ४ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०६/२०१९ रोजी २१/४५ वा.चे सुमारास पुना क्लबचे इन गेटच्या समोर पुणे. |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.व ठिकाणी, यातील फिर्यादी हे एम.जी.रोड वरुन कपडे खरेदी करुन परत जात असताना, पुना क्लबचे इन गेटच्या समोर पुणे. येथे यातील नमुद इसमांनी फिर्यादी व अनिकेत ला म्हणाले की, तुला आमच्या इलाक्यात गांजा ओढण्यास मनाई करुन सुध्दा तु परत का आला असे म्हणुन फिर्यादी व अनिकेतला शिवीगाळ करुन, त्यांनी फिर्यादी यांचे डोक्यास पाठीमागील बाजुस कोयता व हकी स्टीकने मारहाण करुन, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व अनिकेत पिल्ले यांस सुद्धा मारहाण करुन दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.आय.पठाण ८४५९९९७८६३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २७७/१९,भादविक १७०,१७१,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | तानाजी शिंदे, पो.हवा. दत्तवाडी वाहतुक विभाग पुणे शहर |
| **आरोपी** | विवेक रामराव खतोडे,वय ३६ वर्षे,रा.ओम त्रिमुर्ती को-ऑपरेटिव्ह सोसायटी, ब्रम्ह बिल्डींग फ्लॅट नं. ७०४, गणेश मळा,सिंहगड रोड, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०६/२०१९ रोजी १३/०० वा.चे सुमारास सावरकर पुतळा, पाटणकर हॉस्पीटल समोर स्वारगेट, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व पोलीस निरीक्षक, सायकर व इतर कर्मचारी यांचे सोबत हेल्मेट कारवाई करीत असताना,दु.१३/०० वा.चे सुमारास इसम नामे विवेक रामराव खतोडे,वय ३६ वर्ष रा. ओम त्रिमुर्ती को- ऑपरेटिव्ह सोसायटी, ब्रम्ह बिल्डींग फ्लॅट नं. ७०४, गणेश मळा, सिंहगड रोड, पुणे हा त्याचे ताब्यातील होंडा ॲक्टीव्हा आर.टी.ओ.नं. एम.एच.-१२/एन.के.६९७५ ही विनाहेल्मेट चालवित असताना मिळून आला म्हणून त्यास बाजूला घेवून हेल्मेट बाबत कारवाई चालू आहे व आपणांस दंड भरावा लागेल असे सांगून त्याचेकडे वाहन चालविण्याचा परवाना मागितला असता, त्याने त्याचे महाराष्ट्र पोलीस, ॲन्टी टेररिझम स्कॉडचे बनावट ओळखपत्र दाखवून आपण पोलीस उप निरीक्षक असल्याचे सांगून फिर्यादी तसेच पोलीस निरीक्षक यांची दिशाभुल केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. जगताप ७२४९३३४७४६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगडरोड पो स्टे ४०८/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरुष,वय-८५ वर्षे, रा.वडगाव बुाा, पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.४/०६/१९ रोजी सकाळी ०८/३० ते सांय. ०८/४५ वा.चे दरम्यान रा.वडगाव बुाा.पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह घरी हजर असताना, अनोळखी दोन इसम घरात येवून त्यांनी फिर्यादी व त्यांचे पत्नी सोबत ओळख वाढविण्याचा प्रयत्न करून, त्यांनी फिर्यादी व त्यांचे पत्नीस बोलण्यामध्ये गुंतवुन व चलाखी करून फिर्यादी यांचेकडून ३ हजार रूपये रोख व पत्नीचे सोन्याचे मंगळसुत्र असा एकुण ५३ हजार रु.ची विश्वासाने घेवून जावून त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.व्ही.उमरे ९९२२९२३०६९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २०४/१९,भादविक ४०६, ४०८, ४२० |
| **फिर्यादी** | वरुण श्रीनिवासन वय- ३६ वर्षे, रा.बोपोडी पुणे |
| **आरोपी** | हेमंत चंद्रकांत रेड्डी वय- ३७ रा. स.नं.५१,प्लॉट नं. ७५, भैरवनगर धानोरी रोड, अय्यप्पा मंदिराजवळ भैरवनगर, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१८ ते दिनांक २४/०४/२०१९ रोजी चे दरम्यान शिबा कुरीज लि. कंपनी, बोपोडी पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी,फिर्यादी यांचे कंपनीमध्ये डेलि कलेक्शन कामी नेमणूकीस असलेला कामगार नामे-हेमंत चंद्रकांत रेड्डी यांना कस्टमरने त्याचेकडे न्यायाने विश्वासाने सोपविलेली रोख रक्कम सदर रकमेवर त्याची कसलाही हुकमत नसताना ती कंपनीत वेळेत जमा करणे आवश्यक असतांना ती कंपनीत जमा न करता, ती परस्पर स्वतःचे फायदया करीता वापरुन कस्टमरचे एकूण ५,९९,६८२/- रुपयाचा व तसेच इतर इसम यांचीही रक्कम त्यांनी विश्वासाने कंपनीत भरणे कामी दिली असता त्यांने ती परस्पर स्वतःचे फायदया करिता त्याचेवर त्याची कसलीही हुकमत नसतांना अपहार केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमोल भोसले ९५२७३१७५२७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४०७/१९,भादविक ३१५,३१७ |
| **फिर्यादी** | नेताजी कांतागळे,पो.शि.भारती विद्यापीठ, पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात इसम/महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०६/१९ रोजी १६/१० वा.चे सुमारास पुर्वी पंढरपुर अर्बन बँकेचे लगत असलेल्या लेनमध्ये, दळवी नगर, आंबेगाव बुाा, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी, कोणीतरी अज्ञात इसमाने अगर महिलेने स्त्री अपत्य जन्माची लपवणुक करण्यासाठी व जन्मा नंतर स्त्री अर्भकाचा मृत्यु घडावा या उद्देशाने कॅरीबॅगमध्ये घालुन मरणासाठी उघडयावर टाकुन अर्भकाचा परित्याग केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. विद्या राऊत ९१४५४६२०७१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**